# सेवक वार्ता

ऑक्टोबर-२०२१ वर्ष -२, अंक-१२

सेवानिवृत्त वन कर्मचारी संघ, महाराष्ट्र, पुणे    कार्यालय - ब-८, सारस नगर सोसायटी, शुक्रवार पेठ, पुणे - २


## कन्हारगाव अभयारण्य आराखडा अपडेट ......

लवकरच कन्हारगाव वन्यजीव अभयारण्याचा व्यवस्थापन पहिला आराखडा अंतिम करण्यासाठी सेवक संघाने गठीत केलेला चमू कन्हारगाव येथे जाणार आहे. सदरच्या चमूमध्ये सर्वश्री अजय पिलारीसेट, संजय जगताप, संभाजी गवळी, प्रदिप कुलकर्णी व शांताराम कुंभकर्ण यांचा समावेश राहणार आहे. या चमूचे नेतृत्व श्री. व्ही. टी. पत्की सर करणार असून या दौऱ्याचा कालावधी १५ ते २० नोव्हेंबर असा निश्चित करण्यात आला आहे. या दौऱ्यात पोंभुर्णा येथे मुक्कामी राहून आराखड्यास अंतिम रूप दिले जाईल व त्याबाबत स्थानिक वरिष्ठ वन अधिकाऱ्यांना सादरीकरण केले जाईल.

**कन्हारगावअभयारण्य आराखडा** कन्हारगाव वन्यजीव अभयारण्याचा व्यवस्थापन आराखडा तयार करणेकामी सेवक सदस्य व विविध तज्ञांचे सहयोगाने वनस्पती, वन्यप्राणी,पक्षी,फुलपाखरे , किटक इ. क्षेत्रीय सर्वेक्षण यशस्वी रित्या पूर्ण करणेत आले आहे.

----------0000-------------------

## कॅम्पा अंतर्गत रोपवनांचे मुल्यांकन

गतवर्षी सेवक संघ महाराष्ट्रला कॅम्पा निधी अंतर्गत केलेल्या रोपवन कामाचे मूल्यांकन करण्याचे काम मिळाले होते. श्री. विठ्ठल पत्की सरांचे कुशल मार्गदर्शनाखाली व नियोजननुसार संपूर्ण राज्यामध्ये सेवक संघाच्या सदस्यांनी १०३ ठिकाणच्या रोपवनाच्या कामांना क्षेत्रीय भेट देवून मूल्यांकन करून त्यासंबंधात मूल्यांकन अहवाल प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी कॅम्पा - महाराष्ट्र, नागपूर यांना अहवाल सादर केला होता. त्यावेळी काही कामे विविध अडचणीमुळे झाल्यामुळे नव्हती, सबब त्यांचे मूल्यांकन करावयाचे राहिले होत. अशी एकूण ४७ स्थळे शिल्लक होती. आता त्या ४७ कामांचे मूल्यांकन करण्याबाबत सूचना प्राप्त झाल्या असून सदरचे मूल्यांकन काम दसरा ते दिवाळी या दरम्यानच्या कालावधीमध्ये पूर्ण करण्याचे नियोजन ठरले आहे.ही कामे ठाणे, धुळे, पुणे, अमरावती, यवतमाळ,नागपूर या वनवृत्तामध्ये असून त्यांचे एकूण क्षेत्र ६१८ हेक्टर आहे.पुनश्च श्री. विठ्ठल पत्की सरांचे कुशल मार्गदर्शनाखाली व अचूक नियोजनुसार लवकरच हे काम पूर्ण करून त्याचा अहवाल तयार करून सादर करण्यात येईल. सदरच्या मूल्यांकन कामासाठी ९ सेवक सदस्यांची चमू बनवण्यात आली असून त्यात सर्वश्री एस. के.गवळी, पी. के. कुलकर्णी, आर. टी. मोरे, उमेश धोपेश्वरकर, बी.व्ही.सेलुकर, टि. आर. नंदेश्वर, के.ओ.सेमस्कर जी. एस. खांडेकर व मधुकर पाटोळे यांचा समावेश आहे

## कार्यकारी मंडळ बैठक वृत

सेवानिवृत्त वन कर्मचारी संघ केंद्रीय कार्यकारी मंडळाच्या दि.५-१०-२०२१ रोजीच्या आभासी बैठकीत खालील विषयावर चर्चा झाली.

१) कन्हारगाव अभयारण्य व्यवस्थापन आराखडा प्रगती

**दिवाळीच्या सर्वांना हार्दिक शुभेच्छा**

या अंकात . . . . .


१. कन्हारगाव अभयारण्याचा आराखडा..१
२. कार्यकारी मंडळ बैठक वृत . . . . . .. १
३. कॅम्पा निधी अंतर्गत रोपवनचे ....... ....१
मूल्यांकन काम
४. सेवक संघ,उपविधीची ओळख ..........१
५. सेवक संघ विशेष वृत्त .. ... .... ........२
६. कै.गोगटे सरांची आठवण.. .............२
७. निधन वार्ता ... ..... ......... ....... ....२


२) लोक जैविक विविधता नोंदवही प्रायोगिक तत्वावर मूल्यांकन करणेबाबत-

३) माधवाची वनयात्रा पुस्तकाचे पुन:मुद्रण करणेबाबत-

४) रौप्यमहोत्सवी विशेषांक कामाची प्रगती बाबत

५) रौप्यमहोत्सवी विशेषांकासाठी जाहिराती मिळविणेची प्रगती

७) सन २०२०-२१ वर्षासाठीचा आयकर भरणा

८)संघाचे पंजिकृत कार्यालयाचे नोव्हेंबर-२१ अखेर स्थलांतर.

९) वन संवर्धन राखीव क्षेत्र व्यवस्थापन व पर्यटन विकास आराखडे तयार करणे बाबत

या आभासी बैठकीचे सूत्रसंचालन श्री. गवळी यांनी केले.

## सेवक संघ,उपविधीची ओळख

### सेवक संघ, महाराष्ट्रचा सुधारीत उपविधी (भाग - ६)

१३) संघाच्या मध्यवर्ती व वृत्त स्तरीय कार्यकारी मंडळाची सभेची सूचना व गणसंख्या

१३.१) संघाच्या मध्यवर्ती व वृत्त स्तरीय कार्यकारी मंडळाच्या पुढील सभांची सूचना अनुक्रमे प्रत्येक

त्रैमासिक व मासिक सभांमध्ये दिली जाईल.

१३.२) या सभेत मध्यवर्ती कार्यकारी मंडळाच्या पाच, वृत्तस्तरीय कार्यकारी मंडळाच्या चार सभासदांची गणपूर्ती राहील.

१४) संघाच्या मध्यवर्ती व वृत्तस्तरीय कार्यकारी मंडळाच्या निवडणुकीचे उपविधी.

१४.१) कार्यकारी मंडळाच्या सभा--सदांची निवडणूक तीन वर्षांतून एकदा पॅनेल पद्धतीने होईल.

१४.२) सभासदांची निवडणूक वार्षिक सर्वसाधारण सभेत होईल.

१४.३)संघाच्या सभासदांची कार्यकारी मंडळाचे पॅनेलकरीता खालीलप्रमाणे पात्रता राहील.

अ) ज्या सभासदांनी नियम पाचमध्ये नमूद केलेली वर्गणी भरली आहे व कार्यकारी मंडळाच्या सभासद कमीत कमी तीस सभांना हजर राहिले आहेत.

ब) जे सभासद शारीरिक सुस्थितीत आहेत.

क)जे सभासद संघाच्या निरनिराळ्या उपक्रमात सक्रिय भाग घेतात.

१४.४) अ) कार्यकारी मंडळाच्या पॅनेलमध्ये भाग घेऊ शकणाऱ्या सभासदांनी वार्षिक सर्वसाधारण सभेच्या आधी आठ दिवस अगोदर अर्ज करावेत. अर्जावर सूचक अनुमोदक म्हणून अन्य सभासदांच्या सह्या घेणे आवश्यक आहे.

१४.४) ब) अर्ज मंजूर अगर नामंजूर करण्याचा अधिकार अध्यक्षांना आहे. नामंजूर केलेल्या अर्जाबाबत कारणे देणे बंधनकारक नाही.

१४.५) क) निवड अगर नेमणूक पॅनेल पद्धतीने होईल.

## सेवक संघ विशेष वृत्त.

### श्री. अशोक वि. कविटकर यांचा अध्यक्ष सेवक संघ अमरावती पदाचा राजीनामा

सेवक संघ अमरावती शाखेचे अध्यक्ष श्री. अशोक वि. कविटकर यांनी अध्यक्ष पदाचा राजीनामा दिला असून तो अध्यक्ष, सेवक संघ महाराष्ट्र यांचेकडून स्विकृत होणे आहे. अमरावती शाखेचे सदस्यांना सभा घेउन नवीन निवडीसंबंधात सुचना देण्यात आल्या आहेत.

---

"माधवाची वनयात्रा" पुस्तकाच्या ५०० प्रती छापण्यात आल्या होत्या व त्यांची संपूर्ण विक्री झाली आहे. पुस्तकास मागणी येत असून दुसरी आवृत्ती छापणेबाबत विचार चालू आहे. डॉ. परिक्षित माधव गोगटे यांनी "माधवाची वनयात्रा" या पुस्तकाच्या २०० प्रतींची मागणी नोंदविली आहे. प्रिंटरने सुध्दा प्रति प्रत दर रू. ९८/-वरून कमी करून रु.८२.५० प्रत दराने पुरवठा करण्याचे मान्य केले आहे.५०० प्रती रू.४२,५००/-खर्चात मिळतील त्यातील रु२०,०००/-रक्कम डॉ. गोगटे यांचेकडून मिळेल उर्वरित रक्कम रु.२२५००/- सेवक संघाचे कार्यकारिणीकडे गंगाजळीतून खर्च करण्यास मान्यता प्रदान करण्यास विनंती करण्यात आली आहे.ज्यांना पहिल्या आवृत्तीत प्रत मिळू शकली नाही, त्यांना आता संधी मिळणार आहे.

### कै.गोगटे सरांची आठवण

- संभाजी गवळी

"माधवाची वनयात्रा" पुस्तकाच्या हे प्रती मा. मुख्यमंत्री, पर्यावरण मंत्री यांना देण्यासाठी श्री. खारगे सरांना देतेवेळी त्यांनी सांगितले की, मा. मुख्यमंत्री यांनी गोगटे सरांसोगत जंगल भ्रमंती केली आहे. या सेववक कमिटी व्हॉटस्अ‍ॅप गृपवर आलेली पोस्ट वाचल्यावर मला कै. गोगटे सरांची एक आठवण इथे सांगाविशी वाटते.

मी वन संरक्षक, वन्यजीव पश्चिम प्रदेश कार्यालय बोरीवलीत सवसं (वन्यजीव) पदावर सन १९९७-२००० दरम्यान कार्यरत होतो. तेंव्हा केंव्हातरी कै.गोगटे सरांनी मला एक वन्यप्राण्यांसंबंधी अतिशय सुंदर चित्रे असलेले पुस्तक दिले व श्री. उद्धव ठाकरेसाहेब यांच्याकडे देण्यासाठी पाठवले. गोगटे सरांनी पुस्तकात काही पानावर झेंडी (फ्लॅग) लावून होते. फ्लॅगवाली ती सर्व पाने त्यांना दाखवण्यासाठी सूचना दिल्या. कलानगर बांद्रा येथील घराजवळच्या सुरक्षेबाबतही समजावून सांगितलेकी, तुमचे नाव व तुम्ही गोगटेसाहेब यांच्याकडून आले आहेत, असे सांगा म्हणजे थेट श्री. उध्दवसाहेबांपर्यंत पोहचवतील असे सांगितले. त्याप्रमाणे ते पुस्तक पोहचते केले आणि त्या पुस्तकात चिन्हांकन लावलेला प्राणी म्हणजे Caracal होता, जो त्यांनी मेळघाट येथे पाहिला होता,परंतु Caracal ची पुस्तकातून खात्री करायची होती.

### नवीन आजीवन सदस्य

सेवक संघ नाशिक शाखेत खालील आजीवन सदस्यांची नोंदणी झाली. त्यांचे सेवक संघात सहर्ष स्वागत.

(१) श्री. मधुकर सुकदेव पाटोळे, सेनि वपअ नाशिक.

---

संघाच्या मध्यवर्ती कार्यकारिणीची माहे नोव्हेंबर २०२१ मधील सभा दिपावली सणाचा असल्याने त्या पुढील मंगळवारी म्हणजे दिनांक ०९-११-२०२१ रोजी आयोजित करण्यास अध्यक्ष महोदयांनी मान्यता दिली आहे.

## निधन वार्ता

सेवानिवृत्त सहायक वन संरक्षक राजकुमार पटवारी यांचे दि.१७-१०-२०२१ रोजी निधन झाले. ते गुगामल वन्यजीव विभाग,चिखलदरा येथे कार्यरत होते व दि.३१-८-२०२१ रोजी सेवानिवृत्त झाले होते.

---

सेवानिवृत्त वन संरक्षक बी.आर.खैरे यांचे कर्करोगाचे व्याधीने दि.१८-१०-२०२१ रोजी दु:खद निधन झाले ईश्वर त्यांचे आत्म्यास शांती देवो. सेवक संघातर्फे भावपूर्ण श्रध्दांजली.

---

केवळ खाजगी वितरणासाठी
प्रकाशक-सेवक संघ, महाराष्ट्र.पुणे
संपादन - एस. के. गवळी